**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. 3**

दिनांक :- १५/०५/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १५/०५/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ४. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ५. | मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ६. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ७ | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| ८. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| ९ | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १०. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| ११. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १२ | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १३. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १४. | मा. आसवानी सविता धनराज | सदस्य |
| १५. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता रविद्र दुधेकर, शरद जाधव, रामदास जाधव, वसंत काची, जयंत बरशेट्टी, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, सुरेश आव्हाळे लेखाधिकारी, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाने, व्ही.एन.देसले, के.एस. महाजन, संजय घुबे, श्रीम. मोमीन, प्र.अ. घोडे, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, सहा. उद्यान अधि. जी. आर.गोसावी, गायकवाड डी.एन., पशुवैद्यकिय गायकवाड आर. बी. इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. डोके अपर्णा निलेश अनुमोदक : मा. भोंडवे संगिता राजेंद्र

मागील सभावृत्तांत कायम करताना – (माहे एप्रिल २०१३ कार्यपत्रिका क्र. २ मध्ये ठराव क्र. १६, विषय क्र.१५) त्यामध्ये विद्युत विभाग, ब प्रभागाकडील खालीलप्रमाणे कामे समाविष्ट करुन दुरुस्ती करणेत यावी व या दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा.

| अंदाज पपक पान क्र. | अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१३-१४ चा मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| ६२२ | ७ | बिजलीनगर उपविभागातील एस.के.एफ. कंपनी ते चिंचवड नाटयगृह या नाल्याचे कडेचे रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे | २१ | ५००००० | २००००० |
| ६२३ | ११ | मनपा भवन विभागातील विविध शाळा व इमारतीमधील पंपाची दुरुस्ती करणे व नवीन पंप बसविणे. | २७,२८, ३९,४०, ४१ | ५००००० | १५०००० |
| ६२३ | १४ | रावेत किवळे उपविभागातील मनपाचे विविध इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार विद्युत विषयक कामे करणे | १८, १९,५२ | ५००००० | २००००० |
| ६२३ | १५ | बिजलीनगर उपविभागातील मनपाचे विविध इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार विद्युत विषयक कामे करणे | २० ते २२ | ५००००० | २००००० |
| ६२६ | २५ | बिजलीनगर उपविभागातील प्रभाग क्र. २०, २१ व २२ मधील हायमास्ट दिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २०,२१, २२ | १०००००० | २५०००० |
| ६२६ | २६ | चिंचवड बिजलीनगर उपविभागातील दिवाबत्तीच्या केबल व फिडरपिलरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | २०,२१, २२ | १०००००० | २५०००० |
| ६२६ | २७ | रावेत उपविभागातील प्रभाग क्र. १८, १९ व ५२ मधील हायमास्ट दिव्यांची वार्षिक देखभाल दुरस्ती करणे | १८,१९, ५२ | १०००००० | २५०००० |
| ६२६ | २८ | रावेत उपविभागातील दिवाबत्तीच्या फिडल पिलरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | १८,१९, ५२ | १०००००० | २००००० |
| ६२६ | २९ | रावेत उपविभागातील प्रभाग क्र. १८, १९, व ५२ दिवाबत्ती व्यवस्थेची व पोल, जंक्शन बॉक्स, केबल व फिडर पिलरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | १८,१९, ५२ | १०००००० | ४००००० |
| ६२६ | ३० | रावेत, किवळे व बिजलीनगर उपविभागांतर्गत इमारती व जकात नाक्यावरील जनसेट व इन्व्हर्टरची दुरुस्ती, देखभाल व दुरुस्तीची कामे करणे सन २०१३-१४ | १८ ते २२ व ५२ | ५००००० | १००००० |
| ६२६ | ३३ | स्थापत्य विभागाकडून मागणी केलेप्रमाणे मनपा भवन परिसरातील रस्त्यात येणारे दिवाबत्ती व्यवस्था हलविणे | २७, २८ | ९००००० | २००००० |
| ६२६ | ३४ | चिंचवड उपविभागातील विविध प्रभागाती सो.व्हे. दिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२, ४३ | ९९०००० | ३५०००० |
| ६२६ | ३५ | चिंचवड उपविभागातील भाजी मंडई, व्यायामशाळा, समाजमंदिर, बॅडमिंटन हॉल, शाळा इ.प्रकारच्या इमारतीमधील विद्युत विषयक कामांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२,४३ | १०००००० | २५०००० |
| ६२६ | ३६ | चिंचवड उपविभागातील कार्यालये, इमारतीमधील, यू.पी.एस., इन्व्हर्टर यंत्रणेचा जनित्र संचाची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२, ४३ | ५००००० | २००००० |
| ६२६ | ३७ | ब प्रभागातील कार्यालये, इमारतीमधील बोअरवेल, पाणी पंप इ. ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२, ४३ | ५००००० | १००००० |
| ६२७ | ३८ | ब प्रभागातील कार्यालये, इमारतीमधील वातानुकूलीन यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२, ४३ | ५००००० | १५०००० |
| ६२७ | ३९ | ब प्रभागातील कार्यालये, इमारतीमधील ईपीएबीएक्स यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २३ ते २५, ४२, ४३ | ५००००० | १००००० |
| ६२७ | ४० | प्रभाग क्र. २२,२३,२४,२५ येथील सो.व्हे. दिव्यांची फिडर पिलरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | ४३ | ९९०००० | २००००० |
| ६२७ | ४१ | चिंचवड उपविभागातील प्रभाग क्र. २२,२३,२४,४२, व ४३ येथील हायमास्ट दिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | ४३ | ९९०००० | २५०००० |

यापमाणे दुरुस्ती करण्यात आल्याचे व या दुरुस्तीसह कार्यपत्रिका क्र. २, दिनांक १७/४/२०१३ चा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे मा. अध्यक्षा मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी प्रकट केले.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

औंध रावेत बीआर.टी. रोडला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नांव देणेत यावे. तसेच सदर विषय कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही होणेस विनंती.

विषय क्र. ४ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

चिंचवड विद्युत उपविभागातील रोहित्र संचाची दुरुस्ती व अनुषंगिक विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये फक्त) पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

विषय क्र. ५ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनिक्षेपन यंत्रणेची वार्षिक चालन देखभाल दुरुस्ती विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये फक्त) पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

विषय क्र. ६ विभाग : विद्युत मुख्य कार्यालय

मनपाच्या प्रशासकिय इमारतीमधील जनित्रसंचाची तसेच फायर फायटींगचे डिझेल पंपसेटची वार्षिक देखभाल दुरुस्ती विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ९,६०,०००/- (अक्षरी नऊ लाख साठ हजार रुपये फक्त) पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

विषय क्र. ७ विभाग : विद्युत मुख्य कार्यालय

मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीमधील पंपाची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे सन २०१३-१४. विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये फक्त) पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २४ प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मध्ये चिंचवड स. नं. २६९ मध्ये मनपाचा १२ मीटर विकास आराखडयातील रस्ता आहे. सदर रस्त्यामध्ये नाल्यावरती मनपाचे सी.डी. वर्क्स् बांधण्याचे काम चालु आहे. तरी सदर सी. डी. वर्क्सच्या कडेला म्हणजेच १२ मीटर डी.पी. रस्त्यामध्ये २ सिट्सचे संडास ब्लॉक आहे. तरी सदरचे संडास ब्लॉक हटविणेत यावे.

विषय क्र. ९ विभाग : आरोग्य विभाग, ब प्रभाग

**विषय** – औष्णीक धुरीकरणकामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत.

ब प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरणकामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत संबधित आरोग्य निरिक्षक व सहा.आरोग्याधिकरी यांचा अहवाल आलेला आहे.

सदर अहवालानुसार औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत १ दिवसासाठी १ डिझेल रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत र.रु. ८१०/- इतका दर दिलेला आहे. आरोग्य निरिक्षक व सहा. आरोग्याधिकारी यांनी दिलेल्या अहवालातील अंदाजपत्रकानुसार ब प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत कामकाजासाठी १ नियमीत डिझेल रिक्षा टेम्पो साठी अंदाजे ३०० दिवसांसाठी र.रु. ८१०/- प्रमाणे २४३०००/- व २ रे डिझेल रिक्षा

टेम्पो साठी ६ महिने कालावधीकरीता म्हणजेच अंदाजे १५५ दिवसांकरीता र.रु. ८१०/- प्रमाणे १,२५,५५०/- असे एकुण र.रु. ३६८५५०/- इतका खर्च पूर्णांकीत ३६८०००/- इतका खर्च सन २०१३-१४ या सालाकरीता २ डिझेल रिक्षा टेम्पो औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी भाडयाने घेणे करीता निविदा प्रक्रीयासाठी अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

सन २०१३-१४ करीता औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत अंदाजपत्रीय तरतुद र.रु. ५,००,०००/- इतकी करणेत आलेली आहे.

सदर कामास प्रशासकीय मान्यतेकामी मा. प्रभाग समिती पुढे विषय निर्णयार्थ ठेवणेत यावा.

तदनंतर मा. साळुंके सविता सुरेश यांनी माझे प्रभागामध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. तरी के. एस. बी. चौकापासून मोरवाडी पर्यत पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी. असे मत मांडले. यावर मा. बरशेट्टी, कार्य. अभियंता यांनी पाण्याच्या टाकीची जागा निश्चित नसल्याने व सदरची पाईप लाईन जोडणेबाबत निर्णय घेणेचा अधिकार मा. शहर अभियंता यांना असलेने सन्मा. सदस्यांसमवेत मा. शहर अभियंता यांचेशी याबाबत चर्चा करता येईल असे सांगितले.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

माझे प्रभागातील पाणी पुरवठयाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तरी आजची सभा बुधवार दि. १९/६/२०१३ रोजी स. ११.४५ वा. पर्यत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

मा. अध्यक्ष - बुधवार दि. १९/६/२०१३ रोजी स. ११.४५ वा. पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**( दि. १५/०५/२०१३ ची तहकूब सभा )**
**कार्यपत्रिका क्र. 3**

दिनांक :- १९/०६/२०१३ वेळ :- दु. ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **दि. १५/०५/२०१३ ची तहकूब सभा** बुधवार दिनांक १९/०६/२०१३ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ३.. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ४. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १० | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| ११. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२ | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४ | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १५ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १६. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १७. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १८. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १९. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २०. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता रविद्र दुधेकर, शरद जाधव, रामदास जाधव, वसंत काची, जयंत बरशेट्टी, (प्रशासन अधिकारी) सुरेश आव्हाळे लेखाधिकारी, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कौंडे, के. डी. फुटाणे, व्ही.एन.देसले, के.एस. महाजन, संजय घुबे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, चांदेरे आर. बी. पशुवैद्यकिय डॉ. गोरे इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

ठराव क्र. १७ विषय क्र. १

दि. १९/०६/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक: मा.डोके अपर्णा निलेश

संदर्भ : क्र. वि/उ/२/३२/२०१३, दि.२३/०४/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

रावेत उद्यान येथे नविन पोल उभे करून प्रकाश व्यवस्था करणे व वॉटर फॉल बसविणेचे कामास र. रु. १०,०००,००/- ( अक्षरी र. रु. दहा लाख फक्त ) इतक्या खर्चास, पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १८ विषय क्र. २

दि. १९/०६/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा.को-हाळे अनंत सुभाष

संदर्भ : मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि. १७/०४/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

१. प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडी मधील रावेत येथील बी. आर. टी. रोडला नाव देवून त्या प्रमाणे फलक बसविणे किवळे मुकाई चौकापासून सुरु होणा-या औंध रावेत बी आर. टी रोडला स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे नांव देणेत यावे.
२. रावेत स.नं. १०३ मधील सोसायटीचे नांव अभिनव को.ऑ.सोसायटी असे नांव देणेत यावे.
३. वाल्हेकरवाडी स. नं. ११५/१ श्रीपती कॉलनी हे नांव देणेत यावे.
४. किवळे स्मशानभूमीस नागूजी लक्ष्मण धुमाळ वैकुंठ धाम असे नांव देणेत यावे.

सदरचा विषय तहकूब ठेवणेत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १९ विषय क्र. ३

दि. १९/०६/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा.ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक: मा.†>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा.ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि. १५/०५/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

औंध रावेत बीआर.टी. रोडला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नांव देणेत यावे. तसेच सदर विषय कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही होणेस विनंती.

सदरचा विषय तहकूब ठेवणेत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २० विषय क्र. ४

दि. १९/०६/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा.डोके अपर्णा निलेश अनुमोदक: मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : क्र.बप्र/वि/चिंच/१/२०१३, दि.१५/०४/२०१३ रोजीचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड विद्युत उपविभागातील रोहित्र संचाची दुरुस्ती व अनुषंगिक विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये फक्त) इतक्या खर्चास, पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २१ विषय क्र. ५

दि. १९/०६/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा.डोके अपर्णा निलेश अनुमोदक: मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : क्र.बप्र/वि/चिंच/१०/२०१३, दि.१५/०४/२०१३ रोजीचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनिक्षेपन यंत्रणेची वार्षिक चालन देखभाल दुरुस्ती विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये फक्त) इतक्या खर्चास, पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २२ विषय क्र. ६

दि. १९/०६/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक: मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : क्र.कअ२/वि/कावि/२६/२०१३, दि.७/०५/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या प्रशासकिय इमारतीमधील जनित्रसंचाची तसेच फायर फायटींगचे डिझेल पंपसेटची वार्षिक देखभाल दुरुस्ती विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ९,६०,०००/- (अक्षरी नऊ लाख साठ हजार रुपये फक्त) इतक्या खर्चास, पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २३ विषय क्र. ७

दि. १९/०६/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक:मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन अनुमोदक: मा. †>.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : क्र.कअ२/वि/कावि/२५/२०१३, दि.७/०५/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीमधील पंपाची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे सन २०१३-१४. विद्युत विषयक करणेच्या कामासाठी र.रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये फक्त) इतक्या खर्चास, पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २४ विषय क्र. ८

दि. १९/०६/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक:मा. डोके अपर्णा निलेश अनुमोदक:मा.पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा.गावडे जयश्री वसंत यांचे दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २४ प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मध्ये चिंचवड स. नं. २६९ मध्ये मनपाचा १२ मीटर विकास आराखडयातील रस्ता आहे. सदर रस्त्यामध्ये नाल्यावरती मनपाचे सी.डी. वर्क्स् बांधण्याचे काम चालु आहे. तरी सदर सी. डी. वर्क्सच्या कडेला म्हणजेच १२ मीटर डी.पी. रस्त्यामध्ये २ सिट्सचे संडास ब्लॉक आहे. सदरचे संडास ब्लॉक हटविणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २५ विषय क्र. ९
दि. १९/०६/२०१३ विभाग :आरोग्य विभाग, ब प्रभाग
सुचक: मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अनुमोदक:मा.डोके अपर्णा निलेश
संदर्भ : क्र.बप्र/७/कावि/३८८/२०१३, दि.१५/०५/२०१३ रोजीचे पत्र.
मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

**विषय** – औष्णीक धुरीकरणकामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत.

ब प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरणकामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत संबधित आरोग्य निरिक्षक व सहा.आरोग्याधिकरी यांचा अहवाल आलेला आहे.

सदर अहवालानुसार औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत १ दिवसासाठी १ डिझेल रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत र.रु. ८१०/- इतका दर दिलेला आहे. आरोग्य निरिक्षक व सहा. आरोग्याधिकारी यांनी दिलेल्या अहवालातील अंदाजपत्रकानुसार ब प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत कामकाजासाठी १ नियमीत डिझेल रिक्षा टेम्पो साठी अंदाजे ३०० दिवसांसाठी र.रु. ८१०/- प्रमाणे २४३०००/- व २ रे डिझेल रिक्षा टेम्पो साठी ६ महिने कालावधीकरीता म्हणजेच अंदाजे १५५ दिवसांकरीता र.रु. ८१०/- प्रमाणे १,२५,५५०/- असे एकुण र.रु. ३६८५५०/- इतका खर्च पूर्णांकीत ३६८०००/- इतका खर्च सन २०१३-१४ या सालाकरीता २ डिझेल रिक्षा टेम्पो औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी भाडयाने घेणे करीता निविदा प्रक्रीयासाठी अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

सन २०१३-१४ करीता औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत अंदाजपत्रीय तरतुद र.रु. ५,००,०००/- इतकी करणेत आलेली आहे.

सदर कामास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

<u>यानंतर खालीलप्रमाणे चर्चा झाली</u>

मा. साळुंके सविता सुरेश यांनी दि. ३०/५/२०१३ चे पत्रान्वये त्यांचे प्रभागामध्ये पाणी पुरवठा सुरळीत व पुर्ववत झालेला असलेबाबत कळविलेचे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.

मा. गावडे जयश्री वसंत यानी दि. ३०/४/२०१३ चे पत्रानुसार -

ब प्रभाग समितीच्या दि. १२/०८/२००९ रोजीच्या सभेत हिंदुस्तान बेकरीच्या मागील कामदा हौ. सोसायटी जवळील उद्यानास कै. सौ. पार्वतीबाई विठ्ठलराव चिंचवडे यांचे नांव देणेबाबत ठराव मंजूर करुन उद्यानास त्याप्रमाणे नामकरण करण्यात आले होते. सदर उद्यानाच्या नावांत बदल करु नये व नामकरण केलेल्या गोष्टींचे नांव बदलण्याची प्रथा पडू नये. असे मा. अध्यक्ष, ब प्रभाग समिती यांना कळविले आहे.

यावर नामकरण झालेल्या जागेस/ठिकाणास पुन्हा नामकरणांचे ठराव न ठेवणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचित केले.

मा. पानसरे अमिना मोहंम्मद यांनी मोकाट कुत्र्यांबाबतचा प्रश्न उपस्थित केला व उपस्थित सर्व सन्मा नगरसदस्यांनी सदरचा विषय हा गंभीर असलेबाबत मत व्यक्त केले.-

महानगरपालिकेसोबत काम करणा-या एजन्सीकडील प्रतिनिधी तसेच श्री डॉ गोरे यांनी याबाबत होणा-या कारवाईबाबतची माहिती दिली व मोकाट कुत्र्याबाबतची समस्या त्वरीत

निकालात काढण्यासारखी नाही. काही वर्षे सतत यावर कारवाई केलेनंतरच मोकाट कुत्र्यांची संख्या आटोक्यात येऊ शकेल. तसेच हॉटेल, हातगाडया, ढाबे इ. यांना रस्त्यावर उरलेले अन्न न टाकणेबाबत सूचना देणे गरजेचे आहे असे सांगितले व तातडीचे कामासाठी श्री. मनोज ओसवाल फो. क्र. ९८९००४४४५५ यावर संपर्क साधणेबाबत सांगितले.

मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव –

मोकाट कुत्र्यांवर कारवाईबाबतचे काम जलदगतीने होणेकामी काही अडचणी येत असतील तर त्या सोडविणेसाठी प्रशासनाकडून अगर सन्मा. नगरसदस्यांकडून मदत हवी असल्यास तातडीने घ्यावी. त्याप्रमाणे प्रस्ताव ठेवणेबाबत खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

शहरातील मोकाट, उपद्रवकारक कुत्री पकडण्यासाठी महानगरपालिकेचे एक पथक तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी एक पथक अशी दोन स्वतंत्र पथक प्रभागनिहाय नेमण्याची कार्यवाही करावी. त्यासाठी लागणारा खर्च, प्रभागातील तरतूदीमधून करावा. प्रभागामधील तरतूद शिल्लक नसल्यास मा. स्थायी समितीचे मान्यतेने व मा आयुक्त यांचे मान्यतेने इतर शिर्षामधून तरतूद खर्च करण्यात यावी. यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ, यंत्रणा उपलब्ध करुन घेणेबाबत पशुवैद्यकिय विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर कार्यवाही करणेत यावी

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/ /२०१३, दि. १/०७/२०१३